# CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM

MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION COMPANY LTD.

Old Power House Premises, Dr. Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172

No:- CGRF/AZ/AUR/R/ 541 / 2015/ 04 Date :-

To,
01) The Executive Engineer ( Administration)
Nodal Office, O/O Superintending Engineer ,
O&M Rural Circle, M.S.E.D.C.L.,
Aurangabad

*Sub:-* Forwarding of grievance in respect of Shri Vardhman Nemichand ,
At post , Puri Tq. Gangapur Dist. Aurangabad 431 201 ( M.S. )
India ( Consumer No. 506680000141 )

Dear Sir,

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum, in respect of Shri Vardhman Nemichand , At post , Puri . Tq. Gangapur Dist. Aurangabad 431 201

You are requested to Redress the grievance or submit your Para wise reply at the time of hearing. The hearing in the matter will be held on 2**7.01 .2015** at 12.00 Hours.

Member/Secretary
CGRF(AZ) MSEDCL
Aurangabad

Encl: As above

Copy to:-

Shri Vardhman Nemichand ,
At post , Puri Tq. Gangapur Dist.
Aurangabad 431 201

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**प्रकरण क्र.सीजीआरएफ / एझेड / औबाद / ग्रामिण / ५४१ / २०१५ / ०४**

**तक्रार दाखल दिनांक :- ०९.०१.२०१५.**
**निकाल दिनांक :- ०३.०३.२०१५.**

**श्रीमती. वर्धमान नेमीचंद जैन** **तक्रारदार**
**मु.पो. पुरी, ता. गंगापुर,**
**जि. औरंगाबाद ४३१ २०१.**
**( ग्राहक क्रमांक ५०६६८००००१४१ )**

**विरुध्द**

**कार्यकारी अभियंता ( प्रशासन ),** **गैरअर्जदार**
**ग्रामिण विभाग,नोडल ऑफिस,**
**म.रा.वि.वि.कं.म. औरंगाबाद -**

मंच सदस्य
डॉ. भास्कर गो.पालवे, अध्यक्ष
श्री. नामदेव आर गांधले, सदस्य / सचिव
श्री. विलासचंद्र सु. काबरा, सदस्य

**ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचा निर्णय -**

अर्जदार श्री. वर्धमान नेमीचंद बाकलीवाल यांनी दिनांक ३०.१२.२०१४ रोजी महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग ( ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विदयुत लोकपाल ) विनीयम २००६ च्या असूसुची अ या नमुन्यात कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) ग्रामीण विभाग, औरंगाबाद यांचे विरोधात तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जदार हे महावितरण कंपनीचे

दिनांक ११.११.१९८७ पासून घरगुती ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्रमांक ५०६६८४००००१४१ असा आहे. सदर तक्रार अर्जाची प्रत कार्यकारी अभियंता, ग्रामिण विभाग, महावितरण, औरंगाबाद यांना दिनांक ०९.०१.२०१५ रोजी देण्यात आली होती. सदर तक्रारीची संक्षिप्त माहिती खालीलप्रमाणे आहे

१ ) अर्जदाराचे म्हणण्यानुसार , अर्जदार हे वयोवृध्द व आजारी असल्याने त्यांना तक्रार सादर करण्यास उशीर झाला. सदरील अर्जात उपकेन्द्र ०२.०७.२००७ रोजी मंजूर झाले होते. पुरी गांवास ०२.०६.२००८ पासून ढोरेगांव येथील उपकेन्द्रातील विज पुरवठा होणे आवश्यक होता. आजपर्यन्त पुरी गांवास ढोरेगांव उपकेन्द्रातुन विज पुरवठा झाला नाही.आजही लिंबेजळगांव वरुन विदयुत पुरवठा होत आहे. तेथून विज पुरवठा कमी होल्टेजने होत आहे. तसेच पुरवठा अनियमित होत आहे. त्यामुळे ग्राहकांचे नुकसान होत असल्याने त्यांनी महावितरण कडून रुपये ३९१००/- ची भरपाईची मागणी केलेली आहे.

२ ) कार्यकारी अभियंता ( प्रशासन ), ग्रामिण मंडळ, औरंगाबाद यांनी त्यांचे दिनांक १०.०२.२०१५ रोजी पत्रानुसार आपले म्हणणे सादर केलेले आहे. ग्राहकाने अंतर्गत गा-हाणे निवारण कक्षात कधीही अर्ज केलेला नाही. अर्जदाराचे प्रतिनिधी श्री. नेमीचंद धरमचंद बाकलीवाल हे वय ७८ वर्षे हे विज वितरण कंपनीचे ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्रमांक ५०६६८००००१४१ असा आहे. सदरील ग्राहकास विज कंपनीचे वेळोवेळी नोटीस देऊनच विदयुत पुरपवठा खंडीत केलेला आहे . ग्राहकाचे प्रतिनिधी श्री. नेमीचंद धरमचंद बाकलीवाल हे वयोवृध्द ( वय ७८ वर्षे ) आजारी व चालता येत नाही असे असतांना ग्राहकाचा मुलगा या नात्याने स्वत वर्धमान नेमीचंद बाकलीवाल यांनी अथवा प्रतिनिधी देऊन अपील करु शकले असते व दिलेल्या मुदतीत अर्ज केला असता. वयोवृध्द वडिंलांच्या तर्फेच ही केस मुदतवाढ देऊन चालविण्याचा मागील हेतु स्पष्ट होत नाही. दिनांक २९.०१.२०१५ च्या तपासणीत सदरील ग्राहक व वापरकर्ते अनुक्रमे वर्धमान नेमीचंद जैन व नेमीचंद बाकलीवाल हे विज चोरी करीत असल्याचे आढळून आले आहेत. त्यांना घर क्रमांक ९४ खूरी या निर्धारित जागेसाठी विज पुरवठा दिलेला असतांना बेकायदेशीर रित्या व अनाधिकृतपणे घर क्रमांक , ११२, जैन मंदिर

पान क्रमांक ३ /-

पुरी , ( ग्राहक क्रमांक ५०६६८००००१४१ ) च्या कनेक्शन मधून विज पुरवठा चोरुन घेतलेला आढळला त्यामुळे त्यांचेविरुध्द विदयुत कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार व गु.र.न. ५५४ दिनांक ३१.०१.२०१५ नुसार गुन्हा महावितरणने पोलीस ठाणे, जालना येथे गुन्हा दाखल झालेला आहे . ग्राहकाचे कुठलेही आर्थिक मानसिक व शारिरीक नुकसान झालेले नाही. उलटपक्षी विज चोरी करुन मा. मंचाची दिशाभुल करुन मौल्यवान वेळ वाया घालविला आहे. तरी अर्जदारास कसल्याही प्रकारची विलंब माफी देऊ नये व त्यांची तक्रार दाखल करुन घेऊ नये . हि विनंती.

**ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचा निष्कर्ष** -

अर्जदार व गैरअर्जदार यांनी वेळोवेळी सुनावणी दरम्यान सादर केलेली कागदपत्रे व मंचास सादर केलेले म्हणणे यावरुन ग्राहक गा-हाणे निवारण मंच खालील निष्कर्षप्रत आलेले आहे. अर्जदाराची प्रवृत्ती विज बिल न भरण्याकडे आहे. त्यामुळे मंच खालील आदेश देत आहे.

**आदेश**

१ ) अर्जदाराचा अर्ज फेटाळण्यात येत आहे.

२ ) गैरअर्जदार यांनी ग्राहकाकडून नियमानुसार विज बिलाची वसुली करावी.

३ ) अर्जदाराचा अर्ज आर्थिक भरपाईशिवाय निकाली काढण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| डॉ.भास्कर गो.पालवे | विलासचंद्र. सु. काबरा | नामदेव रा.गांधले |
| अध्यक्ष | सदस्य | सदस्य/सचिव |

ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

क्र.सीजीआरएफ/एझेड/जालना / ५४१ /२०१५ / ०४ / दिनांक :-

प्रति,
श्री.वर्धमान नेमीचंद जैन,
मु.पो. पुरी, ता. गंगापुर,
जिल्हा औरंगाबाद
ग्राहक क्रमांक ५०६६८००००१४१

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/जालना / ५४१ / २०१५ / ०४ )

आपण दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रति,सविनय सादर
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

प्रति,
कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. मंडळ कार्यालय, जालना
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
प्लॅाट नं १२,शिवकृपा, विजयनगर,छावणी,
नागपुर ४४००१३
फोन नं. (०७१२)२०२२१९८ - E-mail – cgrfnz@gmail.in /
sectretaryombudsmannagpur@gmail.com